129

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/६८२/२०२२
दिनांक :- ०८ /०७/२०२२.

"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारण, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वस्न क्षेत्र घोषित करण्याची पुर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि;

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.२०४पै, सि.स.नं.२१४६पै, नगररोड, येरवडा, पुणे येथील सिध्दार्थ नगर, येरवडा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्ण / अंशत :झोपडपट्टी क्षेत्रफळ ५५११.७१ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे.) हे क्षेत्र या प्राधिकरणाकडील पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे.; आणि

आणि ज्याअर्थी, सदर मिळकतीचे मुळधारक सरकारी मिलीटरी प्रापर्टी असे नमुद आहे. परंतु मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील PRL/१३६/I, दि.१८/०६/७९ प्रमाणे ए-गुंठे (१-२९५) ७०२८.६० चौ.मी. क्षेत्राचा ताबा मिलीटरी विभागाकडून मिळालेवरून दि.१६/११/८९ रोजी सरकारी नवीन धारक म्हणून सरकारी अशी नोंद करणेत आलेली आहे. तसेच दि.०७/०९/२०१५ राजीच्या सरकारी मिळकत अधिकारी यांचे पत्रावरुन स.नं.२०४ पै व २०५ अ पै, येरवडा गावातील अतिक्रमणासह जमिन तहसिलदार, पुणे शहर यांना दि.२५/०६/१९७९ रोजी ताब्यात दिले असलेचे नमूद केले आहे. उपरोक्त दोन्ही संदर्भावरुन सदर मिळकत ही सरकारी मालकीची असलेचे दिसून येते.; आणि

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे. ग्लोरीफोर्ज बिल्डर्स एल.एल.पी यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे. आणि;

आणि ज्याअर्थी, ७७९०.०० चौ.मी एवढे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१०/१९८४, भाग १ मध्ये घोषित आहे. खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने मोजणी नकाशाच्या आधारे त्रिमीतीय पध्दतीने येणारे एकुण क्षेत्रफळ ५५११.७१ चौ.मी. इतके आहे. सबब, सदरचे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे. आणि;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "प्रारुप झोपडपट्टी योजना प्रसिद्ध

झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील "

असे नमूद केले आहे. आणि;

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे. आणि;

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.२०४पै, सि.स.नं.२१४६पै, सिध्दार्थ नगर, नगररोड, येरवडा, पुणे.

महानगरपालिकेचे नाव :- पुणे महानगरपालिका.

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णतः | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| सिध्दार्थ नगर, नगररोड, येरवडा. | स.नं.२०४पै, सि.स.नं. २१४६पै | सरकारी | ५५११.७१ चौ.मी. | पुर्व - लागू रस्ता.<br>पश्चिमेस - लष्कर हद्द.<br>दक्षिणेस - न.भू.क्र.२१४५पै, स.नं.२०५ अ पै व लागू रस्ता.<br>उत्तरेस - लष्कर हद्द. |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

(राजेंद्र निंबाळकर) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :-०८/०८/२०२२.

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे - यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका पुणे- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.